एफ.वाय.बीए (इतिहास) (पे. 1) 2020-2021

प्रारंभिक भारत : प्रागैतिहासिक काळ ते राष्ट्रकूट - काळ

सेकंड सेमिस्टर - प्रारंभिक भारत - उत्तर मौर्यकाळ ते - राष्ट्रकूट काळ

घटक - १ मध्य आशियाशी संबंध आणि शुंग. सातवाहन काळ.

पार्श्वभूमी :- मौर्य साम्राज्य हे भारतातील पहिले विशाल व वैभवशाली साम्राज्य होते. सम्राट अशोकाच्या मृत्युनंतर कर्तबगार सम्राटांच्या अभावामुळे काही काळातच मौर्य साम्राज्य उन्मळून पडले. मौर्य साम्राज्याचा अस्त (इ.स.पू १८५) ते साम्राज्याला उदय (इ.स. ३२०) हा कालखंड भारतीय इतिहासात 'मौर्योत्तर कालखंड' किंवा 'गुप्तपूर्व कालखंड' म्हणून ओळखला जातो.

ढोबळमानाने हा साधारण ५०० वर्षांचा कालखंड भारतीय इतिहासाच्या दृष्टीकोनातुन फारसा प्रबळ नव्हता. या राजकीय पोकळी च्या फायदा घेऊन मध्य आशियातील ग्रीक, शक, पार्थियन, व कुषाण या परकियांनी भारतात आपली राज्ये स्थापन केली. एवढ्या मोठ्या प्रमाणात परकियांनी भारतात घुसखोरी करून यशस्वीपणे राज्य स्थापण करण्याचा आलेला हा पहिलाच प्रसंग होता. विशेष म्हणजे या परकियांनी अतिशय सहजगत्या भारतीय करण होत गेले. या परकीय राजवटीचा उदय व भारताच्या आर्थिक, सामाजिक, धार्मिक व सांस्कृतिक जीवनावर त्यांच्या पडलेल्या प्रभावाचा अभ्यास या प्रकरणाच्या पहिल्या भागात करणार आहोत.

Scanned with CamScanner

## * अ - भारतीय ग्रीक, शक, पार्थियन, कुषाणांचा उदयास्त

मौर्य सत्तेच्या ऱ्हासानंतर निर्माण झालेल्या अस्थिरतेचा फायदा घेऊन या काळात भारतात अनेक परकीय व भारतीय सत्तांचा उदयास्त झाला. त्यापैकी परकीय सत्ता, त्यांचा कालखंड व संक्षिप्त राजकीय इतिहास पुढील प्रमाणे

| अ.क्र. | राजवट | कालखंड |
|---|---|---|
| १) | ग्रीक | इ.स.पू २०६ ते इ.स.पू.२० |
| २) | शक | इ.स.पू २० ते इ.स.४०१ |
| ३) | पार्थियन | इ.स.पू १५१ ते इ.स.४५ |
| ४) | कुषाण | इ.स १५ ते इ.स १६२ |

Scanned with CamScanner

१) ग्रीक सत्ता ( इ.स.पू. २०६ ते इ.स.पू. २० )

भारतावर आक्रमण करणारी पहिली परकीय सत्ता इराणी होती. इराण (पर्शिया) चा सम्राट सायरस याने इ.स.पू. ५५८ मध्ये भारतावर पहिली स्वारी केली होती. त्यानंतर इराणच्याच दारियस याने इ.स.पू. ५१६ मध्ये भारतावर स्वारी केली होती. पण त्यांना भारतावर आपली पकड निर्माण करता आली नाही.

पुढे मौर्य सत्तेच्या स्थापनेपूर्वी ग्रीक या दुसऱ्या परकीय सत्तेने भारतावर आक्रमण केले. यावेळी ग्रीक सम्राट अलेक्झांडर उर्फ सिकंदर याने इ.स.पू. ३२६ मध्ये हाईडस्पेड किंवा झेलमच्या लढाईत पोरसच्या पराभव केला. आणि भारतात ग्रीक सत्तेची स्थापना केली. अलेक्झांडरच्या मृत्यूनंतर त्याचा सेनापती सेल्युकस भारतातील ग्रीक राज्याचा वारसदार बनला. त्याने भारतातील ग्रीक सत्तेचा विस्तार करण्याचा प्रयत्न केला. पण यावेळी भारतात मौर्य सत्तेचा उदय झाला होता. मौर्य सम्राट चंद्रगुप्ताने इ.स.पू. ३०५ मध्ये सेल्युकसचा 'सिंधूच्या लढाईत' पराभव करून ग्रीकांना भारतातून हुसकावून लावले त्यानंतर मौर्यांच्या काळात पुढील शंभर वर्षांत ग्रीकांनी भारतावर आक्रमण करण्याचे धाडस केले नाही.

मौर्यांच्या अस्तानंतर मात्र निर्माण आलेल्या दोलायमान स्थितीचा फायदा घेऊन ग्रीकांनी पुन्हा भारतात सत्ता स्थापण्यात यश मिळविले. यावेळी डिमिट्रियसने इ.स.पू.१८५ मध्ये भारतावर स्वारी करून पंजाब व सिंधवर ~~वर्चस्व~~ वर्चस्व निर्माण केले. पण त्याच्या ग्रीसमधील राज्यात उठाव होऊन ते राज्य त्याच्या ताब्यातून गेले. त्यामुळे डिमिट्रियसला भारतातच राहवे लागले. त्या युक्रेटिडीझने डिमिट्रियसचे बॅक्ट्रीयाचे राज्य बळकावले त्यानेच लगेच हिंदुस्थानातील प्रदेशावरही स्वारी केली. डिमिट्रियसला पराभव केला. पण परत ग्रीसला जाताना अपोलोडोटस या मुलानेच वडील युक्रेटिडीझला ठार केले व भारतावरही स्वारी केली. पण डिमिट्रियसच्या शूर सेनापती मिनेंडर उर्फ मिलिंद याने अपोलोडोटसला रोखून भारतातील ग्रीक राज्याचे रक्षण केले. मिनेंडरने भारतातील ग्रीक राज्याचे मजबूत संघटन केले. इ.स.पू.१६० ते इ.स.पू १५० 'सियालकोट' म्हणजेच शाकल ही त्यांची राजधानी होती. मिनेंडरनंतर साधारण शंभर वर्षांपर्यंत ग्रीकांचे भारतातील राज्य टिकून होते. ग्रीकांना भारतीय जीवनावर विशेष प्रभाव निर्माण झाला. हिंदुस्थानात राज्य करणाऱ्या या बॅक्ट्रियन ग्रीकांनाच इंडोग्रीक असेही म्हणतात. इ.स.पू.२० मध्ये भारतातील ग्रीक सत्तेचा शेवट झाला. पण ग्रीकांचा भारतीय जीवनावर बराच प्रभाव पडला.

## २) शकसत्ता (इसपू २० ते ४०९)

* **तक्षशिला शक** :- भारतात इंडोग्रीकांच्या अस्तानंतर शकांची राजवट सुरु झाली. शकांनी भारतात चारशे वर्षे राज्य केले. शकांच्या टोळ्या चीन, बॅक्ट्रिया व हिंदुकुश पर्वताच्या पायथ्याशी राहत होत्या. यु-ताव-लाबवईन, मो-फू व मोगा या तीन टोळ्या भारतात आल्या. भारतातील इंडोग्रीकांना पराभूत करुन मोगाने पंजाबात शक सत्ता प्रस्थापित केली. त्यानंतर ॲझस इसपू २० मध्ये ~~सत्तेचा~~ सत्तेचा भारतात पहिला, अझीसिलास व ॲझस दुसरा यांनी शक विस्तार केला. तक्षशिला त्यांची राजधानी होती म्हणून त्यांना तक्षशिलेचे शक म्हणतात. शकांच्या टोळ्यांत सतत सत्तासंघर्ष होत राहिला त्यामुळे शक भारताच्या विविध भागात विखुरले गेले. त्यांनी देशाच्या विविध भागात आपली स्वतंत्र राज्य निर्माण केली.

* **मथुरा शक** :- शकांच्या तक्षशिला शाखेतील काही शक उत्तर भारतात होते. तिथे त्यांनी शक सत्तेची स्थापना केली. त्यांना मथुरा येथे त्यांनी आपली राजधानी स्थापन केली त्यांना मथुरेचे शक म्हणून ओळखले जाते. कुसुलक, पतीक, हगमश, राजुल व सोडस हे शकांचे मथुरा शाखेतील कर्तबगार राजे होऊन गेले.

* **महाराष्ट्र शक** :- शकांच्या काही टोळ्या महाराष्ट्रातही दाखल झाल्या. त्या काळात महाराष्ट्रातील प्रदेशावर सातवाहनांचे राज्य होते. शकांनी त्यांना पराभूत करुन आपले राज्य प्रस्थापित केले. त्यांनी पैठण ही सातवाहनांची राजधानी जिंकली शकांच्या या महाराष्ट्र शाखेत भूमक, नहपान, व उषावदत्त हे पराक्रमी राजे होऊन गेले.

* **उज्जयनी शक** :- शकांप्रमाणेच कुषाण या देखील रानटी टोळ्या होत्या. त्यांनी उत्तर भारतातून शकांना हुसकावून लावल्यानंतर त्यातील

काही माळवा मध्यप्रदेशात आले. तिथे शकांनी आपले राज्य निर्माण केले. आणि उज्जयनी हे राजधानीचे ठिकाण केले. या शकशाखेत रुद्रदामन हा पराक्रमी राजा होऊन गेला. यशोमती, चष्टन, जयदामन रुद्रसिंह हे उज्जयनीच्या शाखेतील पराक्रमी राजे होते.

शकांच्या राजांना क्षत्रप म्हणत.

या शकांनी भारतात चारशे वर्ष सत्ता गाजवली या काळात त्यांनी गांधार, पंजाब, काश्मीर, राजस्थान, उत्तरप्रदेश, महाराष्ट्र, गुजरात, माळवा या भारतातील बऱ्याच मोठ्या प्रदेशावर राज्य केले. शेवटी गुप्तराजा चंद्रगुप्त विक्रमादित्याने इस ४०९ मध्ये रुद्रसिंहला पराभव करून शक सत्तेचा शेवट केला. मध्य आशियातून आलेल्या शकांच्या दीर्घकालीन सहवासाला भारतीय जनजीवनावर विशेष प्रभाव निर्माण झाला. शकांनाच 'सिथियन' असेही म्हणतात.

Scanned with CamScanner

## ३) पार्थियन सत्ता (इ.स.पू १७१ ते इ.स ४५)

पार्थियन मूळचे इराणचे होते. मौर्यपूर्वकाळात इराणच्या सायरस व दारियस यांनी भारतावर आक्रमणे केली होती. पण त्यांना सत्ता स्थापन करता आली नाही. मौर्योत्तर काळात निर्माण झालेल्या पोकळीचा फायदा घेऊन ग्रीक व शकांच्या प्रमाणेच पार्थियनांनी देखील भारतात आपली सत्ता स्थापन केली. वायव्य भारतात शकांच्या बरोबरच पार्थियनांनी आपला जम बसविला. वायव्य पार्थियनांनाच 'पह्लव' म्हणून देखील ओळखले जाते. भारतातील एका छोट्या भागावर पार्थियनांचे राज्य होते.

मिथ्रीडेट्स (इ.स.पू १७१ ते इ.स.पू १३८) हा पार्थियनांचा पहिला पराक्रमी राजा होता. त्याने सिंधू नदीपर्यंतचा प्रदेश, मथुरा व तक्षशिला हे प्रदेश नियंत्रणाखाली आणले.

गोंडोफेरस (इ.स १९ ते इ.स ४५) हा एक पार्थियनांचा प्रभावशाली राजा होऊन गेला. गोंडोफेरसनंतर पार्थियनांचे राज्य विस्कळीत झाले. इ.स ४५ मध्ये पार्थियन सत्तेचा अस्त झाला.

## ४) कुषाण सत्ता (इ.स १५ ते इ.स १८२) :- पार्थियनानंतर मध्य-

आशियातून भारतात आलेली कुषाण ही एक महत्वाची सत्ता होती. त्यातील 'कुषाणी' या बलाढ्य टोळीने इतर टोळ्यांना पराभव करून पश्चिम आशिया व भारतात बलाढ्य राज्य निर्माण केले.

भारतात राज्य करणारी कुषाणांची दोन राजघराणी पाहायला मिळतात १) कुषाणी टोळीशी संबंधीत आणि २) किओशुआंग टोळीशी संबंधीत. कुषाणी टोळीशी संबंधीत घराण्यातील कुजुल कॅडफिसेस (इ.स १५ ते इ.स ६५) व विमकॅडफिसेस (इ.स ६५ ते इ.स ७८) या राजांनी राज्य केले. तर किओशुआंग टोळीशी संबंधीत कनिष्क

(इ.स. ७८ ते १०१) यांचे राज्य होते त्यांचे भारतात कुषाण सत्तेचा मोठ्या प्रमाणावर विस्तार केला. त्यांनी इ.स ७८ मध्ये भारतात शके ही कालगणना सुरु केली. त्यानंतर या कुळातील हुविष्क याने कुषाण साम्राज्याचे वैभव वाढविण्याचा प्रयत्न त्यानंतर दुसरा कनिष्क व वसुदेव हे राजे होऊन गेले. इ.स १७८ मध्ये कुषाण सत्तेचा शेवट झाला.

⊛ मध्य आशियातील संबंधाचा प्रभाव :- मौर्योत्तर काळात भारतात मध्य आशियातील देशातील स्थिरावलेल्या ग्रीक, शक, पार्थियन, कुषाण या मध्य आशियातील देशातील सत्तांचा भारतावर विशेष प्रभाव निर्माण झाला. त्यांच्या संपर्कात आल्यामुळे भारतीयांच्या आर्थिक, सामाजिक, धार्मिक, व सांस्कृतिक जीवनात नवे महत्वपूर्ण बदल झाले.

⊛ आर्थिक जीवनावरील प्रभाव :- मौर्योत्तर काळात मध्य आशियातील ग्रीक, शक, पार्थियन, कुषाण यांच्याशी भारतीयांचा संबंध आल्याने भारतातल्या शेती, उद्योग, दळणवळण, चलन या आर्थिक क्षेत्रात काही महत्वपूर्ण बदल झाले.

१) शेती – या काळातही शेती हाच अर्थव्यवस्थेचा केंद्रबिंदू होता. सर्वच राजवटींनी शेतीतून मिळणाऱ्या महसुलाचे महत्व जाणले होते. त्यामुळेच शक-कुषाण राज्यकर्त्यांनी शेतीवर विशेष लक्ष केंद्रीत केले. त्यांनी कृषीशील करविषयाचे रचना यांना पुरवठा केला. पाटबंधारे, तलाव, कालवे अशा जलसिंचनाच्या

सुविधा निर्माण केल्या. तत्कालीन अवशेषावरून पाकिस्तान, अफगाणिस्तान आणि मध्य आशियातील जलसिंचनाच्या जास्तीत जास्त सुविधा कुषाणांच्या काळातील होत्या. असे स्पष्ट होते. त्यांनी शेतीमालाला योग्य बाजारपेठ मिळेल व शेतकऱ्यावरील महसुलाचा भार कमी होईल याची दक्षता घेतली होती. थोडक्यात या काळात शेती व्यवसायात अनेक नावीन्यपूर्ण बदल झाले

2) उद्योग :- या काळातील सत्ताधिशांनी उद्योगधंद्यांनाही प्रोत्साहन दिले. परिणामी ग्रामीण स्वरूपाच्या कुटीर उद्योगाचे प्रमाण त्या काळात जास्त होते. कापड उद्योग, रेशीम उद्योग, कुंभारकाम, सुतारकाम, शस्त्र, दागिने, उपकरणे, शोभेच्या बनविण्याचे उद्योग भरभराटीस आले होते. चैनीच्या वस्तूंना देशविदेशात मोठी मागणी होती. या काळात उद्योगा-च्या विकास झाला होता. या उद्योग व्यवसायिकांच्या श्रेणी नावा-च्या संघटना होत्या. उद्योगधंद्यांच्या विकासात या श्रेणींचे महत्व अनन्य साधारण होते. निरनिराळ्या उद्योगांना लागणारे भांडवल श्रेणी पुरवत असत. मिळालेल्या नफ्यातील काही रक्कम उद्योजक श्रेणी-कडे ठेवी स्वरूपात ठेवत असत. त्यामुळे श्रेणी या संघटना आर्थिकदृष्ट्या सक्षम होत्या. राजकर्तेही श्रेणींचे महत्व जाणून होते. या काळातील उद्योग व्यवसायाच्या भरभराटीमध्ये तत्कालीन श्रेणी व सत्ता-धिशांची भूमिका महत्वाची होती.

3) व्यापार :- मध्य आशियातून आलेल्या सत्ताधिशांमुळे मध्य आशिया व भारत यांच्यातील व्यापारी दळणवळण मोठ्या प्रमाणात सुरू झाले. या काळात इजिप्त व रोमशी भारताचा व्यापार प्रस्थापित झाला. रोम व मध्य आशियातून सोने, मद्य, मद्यकुंभ, व मातीची सुबक भांडी भारतात आयात होत होती. तर मलमल, कापड, मसाल्याचे पदार्थ, चैनीच्या वस्तू, आमूल्यावस्तू व औषधे भारतातून मध्य आशियाकडे निर्यात होत होती. हा सर्व व्यापार भू व जलमार्गाने होत होता. भडोच, सोपारा, अरिकामेडु व ताम्रलिप्ती या बंदरातून परदेशाशी मोठ्या प्रमाणावर व्यापार चालत होता. या काळात पाटलीपुत्र, उज्जयिनी, पैठण, श्रावस्ती, साकेत,

Scanned with CamScanner

तक्षशिला या बाजारपेठा प्रसिद्ध होत्या. व्यापारी व प्रवाशांच्या (८)
सोयीसुविधांची व सुरक्षिततेची राज्यकर्त्यांनी योग्य ती खबरदारी घेतली
होती. त्यामुळे या काळात व्यापाराची भरभराट झाली होती.

४) <u>चलन (नाणी)</u> :- ग्रीक, शक, कुषाण व पार्थियन यांच्या भारतीय
चलन अथवा नाण्यावर विशेष प्रभाव निर्माण झाला. ग्रीकांपूर्वी
भारतात 'आहत' ही नाणी होती. ती आकार, वजन व कलाकुसर या
दृष्टीने प्रमाणशीर नव्हती. ग्रीकांनी नाण्यामध्ये लक्षणीय बदल केले.
त्यांनी सुंदर, कलात्मक प्रमाणशीर व चांगल्या आकाराची रेखीव नाणी
चलनात आणली. त्याचेच अनुकरण पुढे कुषाण व गुप्त राजांनी केले.
सुवर्णनाण्यांचा मोठ्या प्रमाणावरील कुषाण राजांनी केला. शकांनी
नाण्यावर खरोष्ठी व ब्राह्मी लिपीतील मजकूर कोरले इराणी व
ग्रीकांनी चौकोणी, गोल, षटकोणी अशी विविध आकाराची तांब्याची
नाणी चलनात आणली. या नाण्यांवर एका बाजूला धार्मिकचिन्ह व
दुसऱ्या बाजूला नाण्याचे मूल्य कोरलेले असे. काही नाण्यावर राजाचीही
प्रतिमा कोरलेली असे त्यामुळे इतिहास समजण्यासही मदत होते.
एकंदरीत या काळातील नाण्यावर मध्य एशियन सत्तांचा विशेष
प्रभाव पडल्याचे दिसते.

थोडक्यात, मौर्योत्तर काळात परकीय राजवटींच्या प्रभावा
मुळे भारतीय आर्थिक जीवनात काही महत्त्वपूर्ण बदल झाले. भारतीय
आर्थिक विश्वाला प्रभावित करणारे हे बदल महत्त्वाचे होते.

---x x---x o x---

## सामाजिक जीवनावरील प्रभाव :-

मध्य आशियातील आशोयातील आक्रमकांनी मौर्योत्तर भारतात आपली राज्य स्थापन केली. मूळ भारतीय समाजजीवनाशी त्यांचा संबंध प्रस्थापित झाला. कालांतराने आपली मूळ ओळख विसरून ते पूर्णपणे भारतीय झाले. त्यातूनच भारतीय समाजजीवनात अनेक बदल घडून आले. तत्कालीन भारतात चातुर्वर्ण्य व्यवस्था रूढ होती. बाहेरून आलेल्या परकियामध्ये लढवय्या योद्धा वर्ग मोठ्या प्रमाणात होता त्यामुळे त्यांना क्षत्रिय मानून क्षत्रियवर्गात स्थान देण्यात आले. पण त्यांना दुय्यम दर्जाचे क्षत्रिय असा दर्जा दिला. ग्रीक, शक, पहलव, कुषाण असे नवे लोक समूह भारतीय समाजात सामावून गेले परकियांच्या नव्या चालीरिती व वेशभूषांना प्रभाव निर्माण झाला. शक, कुषाणांना फेटा, बंडी, पायजमा, लांबकोट व बूट या गोष्टी भारतीयांनी स्वीकारल्या. एवढ्या मोठ्या प्रमाणात परकीयांना भारतीय समाजात सामावून घेण्याची प्रक्रिया एरवी कधी झाल्याची पाहायला मिळत नाही. याचे काही विघातक परिणामही झाले जाती-जातीत संकर होऊन अनेक कूट प्रश्न निर्माण झाले.

मध्य आशियातील आक्रमकांनी इथल्या छोट्या छोट्या राजांना जिंकून त्यांच्यावर आपली सत्ता प्रस्थापित केली ते स्वतःला राजांचा राजा म्हणू लागले. त्यामुळे समाजात सरंजामशाही व्यवस्था विकसीत झाली. शकांची 'क्षत्रप' ही कल्पना त्याचाच एक भाग होती. क्षत्रप म्हणजे क्षेत्रपाल किंवा अधिकारी हा एखाद्या सरंजामदारासारखाच होता. थोडक्यात या काळात भारतीय समाजजीवनात अनेक बदल झाल्याचे दिसते.

→ x →

(३) **धार्मिक प्रभाव** :- मध्य आशियातुन आलेल्या परकीय सत्ताभारतीय भूमिशी समरस झाल्या. या काळात भारतात वैदिक, बौध्द, व जैन हे धर्म प्रमुख होते. परकियांच्या वास्तव्यामुळे, संपर्काने या धर्मातही अनेक महत्व ~~बदल~~ घडून आले. वैदिक धर्मात शैव व वैष्णव पंथ निर्माण झाले होते. काही परकीयांनी वैष्णव पंथ स्वीकारला. अन्य काही सत्ताधिशांनी बौध्द धर्माला अंगिकार केला. काही कुशाण राजे शिव व बौध्द या दोघांचीही पुजा करत होते कारण कुशाण राजांच्या नाण्यावर या दोघांच्याही प्रतिमा आढळतात. हेलिओडोरस या ग्रीक राजप्रतिनिधीने विष्णुची विष्णुच्या सन्मानार्थ मध्य प्रदेशातील विदिशा जवळ एक स्तंभ उभारला : होता. कनिष्क या कुशाण राजावर बौध्द धर्माचा प्रभाव होता. त्याच्या काळात भारतात अनेक स्तूप व चैत्यगृहांची निर्मिती झाली तसेच त्याच्या पुढाकाराने काश्मीरमधील कुंडलवनविहार येथे बौध्द धर्माच्या चौथ्या परिषदेचे आयोजन केले होते. त्याच परिषदेत महायान पंथाला उदय झाला.

या काळात मध्य आशियातून मोठ्या प्रमाणात भारतात आलेल्या परकियांमुळे धर्मपरिवर्तनाला मोठ्या प्रमाणात चालना मिळाली. आर्थिक भरभराटीलाही धर्मावर प्रभाव पडला. यातून बौध्द धर्मात महायान पंथाचा उदय झाला. मौर्योत्तर काळात परकीयांच्या आगमणामुळे भारतीय धर्म-जीवनात अनेक बदल घडून आले त्यांच्याच प्रभावामुळे उत्तर व मध्य आशियात बौध्द धर्माला मोठ्या प्रमाणात प्रसार झाला.

—x—x—

४) सांस्कृतिक जीवनावरील प्रभाव :-

मध्य आशियातून येऊन भारतात स्थिरावलेल्या परकीयांचा इथल्या सांस्कृतिक जीवनावरही प्रभाव पडला या काळात परदेशी व भारतीय परंपरांची देवाण घेवाण सुरू झाली. कला, स्थापत्य, साहित्य या सांस्कृतिक घटकांवर त्याचा विशेष प्रभाव पाहायला मिळतो. स्थापत्यात मध्य आशियाई शैली, गांधार शैली व मथुरा शैली उदयास आल्या

१) मध्य आशियाई शैली :- परकीयांनी मध्य आशियातून आपल्या बरोबर कुशल कारागिर, कलाकार, गवंडी यांना आणले होते. मध्य आशियातील शिल्पाला स्थानिक व भारतीय घटकांचे मिश्र होऊन जी नवी शैली निर्माण झाली तिला मध्य आशियाई शैली म्हणतात.

२) गांधार शैली :- भारताच्या वायव्य सरहद्दीवरील गांधार प्रदेशात मध्य आशियाई व भारतीय कारागीरांच्या मिश्रणातून जी शिल्पशैली उदयास आली तिला गांधार शैली असे म्हणतात. कला विषयाला आत्मा भारतीय आणि आविष्कार ग्रीक शैलीच्या असे त्याचे स्वरूप होते. त्यामुळे तिला इंडो-ग्रीक शैली असेही म्हणतात. या गांधार शैलीने सुबकता, रेखीवपणा, बारकावे, नक्षीकाम, अलंकार यावर विशेष लक्ष दिले होते.

३) मथुरा शैली :- कृष्णाची जन्मभूमी मथुरा हे देशी कलेचे केंद्र होते. पण परकीयांच्या प्रभावामुळे तिथे नवी कला शैली उदयास आली तिला 'मथुराशैली' या नावाने ओळखले जाऊ लागले. या शैलीवर परकीयांचा प्रभाव असला तरी त्याचा मुख्य कलास्रोत हा भारतीय होता. बुद्ध प्रतिमां बरोबर जैन व हिंदू देवदेवतांची शिल्पेसुद्धा घडविली कनिष्काच्या शिरोहीन पुतळा तसेच स्त्री पुरुष प्रतिमा यांचे ओळीकार मथुरा शैलीतील सुंदर शिल्पे पाहायला मिळतात. मथुरा येथील संग्रहालयात आजही इडण मथुरा शैलीचा पाहायला मिळते.

५) वाङ्मय प्रभाव :- या काळातील परकीयांना भारतीय साहित्य विश्वावरही प्रभाव पडला. परकीय राजांनी संस्कृत वाङ्मयाला उत्तेजन दिले कुषाणांनी आश्रय दिलेल्या अश्वघोष या विद्वान साहित्यिकाने 'बुद्धचरित' हा प्रसिद्ध

Scanned with CamScanner

काव्य ग्रंथ - संस्कृतमधून लिहिले या काळात परंपरेच्या विकासातून बौद्ध संस्कारीत संस्कृत भाषेत महावस्तू व दिव्यावदान हे प्रसिद्ध साहित्य उदयास आले.

थोडक्यात मध्य आशियाचा भारताशी संबंध प्रस्थापित झाल्यानंतर त्याचा भारतीय जीवनावर विविधांगी प्रभाव पडल्याचे स्पष्ट होते.

—×—

Scanned with CamScanner

## ब) शुंग-सातवाहन काळ :- मौर्यसत्तेचा अस्त झाल्यानंतर उत्तर तसेच मध्य आणि दक्षिण भारतात अनेक देशी विदेशी राज्य अस्तित्वात आली, यामध्ये शुंग नकुल हे मौर्यांचे उत्तरेतील देशी उत्तराधिकारी होते. तर सातवाहन हे मध्य व दक्षिण भारतातील मौर्यांचे उत्तराधिकारी होते. या शुंग सातवाहन राजवटींनी व त्यांच्या राजकीय भारतीय उत्तराधिकारी होते. या शुंग सातवाहन राजवटींनी व त्यांच्या राजकीय प्रशासकीय, सामाजिक, आर्थिक व सांस्कृतिक जीवनाला परिणाम करून घेणे महत्वाचे आहे.

### १) शुंग राजवट :- (इ.स.पू. १८५ ते इसपू ७५) :- बृहद्रथ हा मौर्यांचा शेवटचा राजा याची त्याचाच सेनापती पुष्यमित्र शुंग याने हत्या केली. सावकाशपणेच मौर्य सत्तेचा शेवट होऊन मगधावर शुंग घराण्याची सत्ता प्रस्थापित झाली. पुष्यमित्रासहित या घराण्यात एकूण दहा राजे होऊन गेले. त्यांनी सुमारे ११० वर्षे राज्य केले पण पुष्यमित्र हाच प्रभावशाली राजा या घराण्यात होऊन गेला.

शुंग राज्यकर्ते - १) पुष्यमित्र शुंग
२) अग्निमित्र
३) वसुज्येष्ठ
४) वसुमित्र शुंग
५) आंध्रक
६) पुलिंदक
७) घोष
८) वज्रमित्र
९) भागभद्र
१०) देवभूती

देवभूती या घराण्यातील शेवटचा राजा होता. वासुदेव कण्व हा त्याचा प्रधान होता त्याने देवभूतीला ठार करून शुंग सत्तेचा शेवट करून मगधावर इ.स.पू. ७५ मध्ये कण्व घराण्याचे राज्य स्थापन केले.

* **सातवाहन राजवट** :- सातवाहन हे महाराष्ट्रातील पहिले वैभवशाली साम्राज्य होते. त्याला नेमका कालखंड, मूळस्थान, सातवाहन राजांची संख्या याबाबत संशोधकात मतभिन्नता आहे ~~आणि~~ आंध्र किंवा आंध्रभृत असा त्यांचा उल्लेख केला जातो. त्यांची पहिली राजधानी आंध्र प्रदेशातील ~~श्रीकाकुलम~~ होती तर महाराष्ट्रातील प्रतिष्ठान म्हणजेच पैठण ही त्यांची दुसरी राजधानी ~~होती~~. सिद्ध होते! ~~महाराष्ट्राचे पहिले सम्राट~~' असा त्यांचा उल्लेख केला जातो. सातवाहन सम्राट सिमुक या सातवाहन साम्राज्याचा संस्थापक मानला जातो. त्यानंतर कृष्ण किंवा कृष्णा, त्यानंतर पहिला सातकर्णी, दुसरा सातकर्णी, हाल, गौतमीपुत्र सातकर्णी हे प्रमुख सातवाहन राजकर्ते होऊन गेले. त्यानंतरही वासिष्ठीपुत्र पुलुमावि, यज्ञश्री सातकर्णी हे सातवाहनांचे प्रभावशाली राजे होऊन गेले. यज्ञश्रीनंतर अल्पकालीन राजे सत्तेवर येऊन गेले. आपआपसातील भांडणामुळे सातवाहन साम्राज्य मोडकळीस आले. व इ.स तिसऱ्या शतकात सातवाहन ~~साम्राज्य~~ साम्राज्याला शेवट झाला. या घराण्यात ३० राजे होऊन गेले पण त्यांची सविस्तर माहिती मिळत नाही. ~~अल्प~~ बलाढ्य साम्राज्य निर्मिती, वैदिक धर्माचे पुनरुज्जीवन, आर्थिक व सांस्कृतिक वैभव या दृष्टीने सातवाहन राजवट महत्त्वाची आहे. राष्ट्रीयतेतील पहिले बलाढ्य साम्राज्य म्हणून सातवाहन राजवट ओळखली जाते.

* **सातवाहन राज्यकर्ते** :- १) सिमुक, २) कृष्ण, ३) सातकर्णी पहिला, ४) वेदिश्री, ५) शक्तिश्री, ६) सातकर्णी दुसरा, ७) अपिलक ८) मेघस्वाति ९) स्वाति १०) स्कंदस्वाति, ११) मृगेन्द्र १२) कुंतल, १३) स्वातिकर्ण, १४) पुलुमावि पहिला १५) अरिष्टकर्णी १६) हाल १७) मंतलक १८) पुरीन्द्रसेन १९) सुंदर सातकर्णी २०) चकोर सातकर्णी.

२२) शिवश्री, २३) गौतमीपुत्र सातकर्णी, २४) वसिष्ठपुत्र श्री पुळुमावी २५) मद्री सातकर्णी
२६) मांडरिक शकसेन २६) विजय सातकर्णी. २७) चंद्रश्री. २८) रुद्र सातकर्णी
२९) पुळुमावी द्वितीय ३०) पुळुमावी तिसरा।

त्यातील प्रमुख राजांची माहिती पुढीलप्रमाणे -

१) सिमुक - सिमुकने सातवाहन राज्य स्थापन केले. नाणेघाट येथील आलेखात त्याचा उल्लेख राजा सिमुक सातवाहन असा केला आहे. त्यानंतर त्याचा भाऊ कृष्ण सातवाहनाचा राजा आला. पण या काळात सातवाहनांचा फारसा विस्तार झाला नाही.

२) पहिला सातकर्णी :- कृष्ण किंवा कन्ह नंतर पहिला सातकर्णी हा राजा सत्तेवर आला. त्याने सातवाहन सत्तेचा वेगाने विस्तार केला. त्याने सातवाहनाचा प्रदेश विस्तार केला असे पूर्वेस कलिंगापर्यंत त्याने सातवाहनांचा प्रदेश विस्तार केला असे हत्तीगुंफा आलेखात नमूद केले आहे. तसेच महाराष्ट्रातील अपरांत म्हणजेच पश्चिम किनारपट्टीचा कोकणाचा प्रदेशही त्याने जिंकला. यावेळी त्याने महाराष्ट्रात सत्ताविस्तार नागनिका या मराठी राजकन्येशी विवाह केला. त्याने आपल्या विस्तारित साम्राज्याच्या सुरक्षिततेसाठी दुसरी राजधानी स्थापन केली. प्रतिष्ठान म्हणजेच पैठण या ठिकाणी सातवाहनांची दुसरी राजधानी स्थापन केली. त्याने वैदिक धर्माला राजाश्रय दिला. महाराष्ट्रातील विजयाप्रित्यर्थ त्याने अश्वमेध व राजसूय यज्ञ केले. इतर धार्मिकबाबतही त्याचे धोरण सहिष्णू असावे. कारण याच काळात जैन व बौद्ध धर्माचाही विकास होत होता. सातवाहन सत्तेचा विस्तार करणारा हा पहिला बलशाली सम्राट होता.

३) दुसरा सातकर्णी :- पहिला सातकर्णीनंतर बराच काळ सातवाहन सत्तेचा प्रभावशाली राजा लाभला नाही. दुसरा सातकर्णी सत्तेवर आल्यानंतर सातवाहन सत्तेला बळकटी प्राप्त झाली.

४) हाल :- सातवाहनांचा हा विद्वान पराक्रमी राजा विशेष महत्वाचा होता. त्याचे साहित्यिक, सांस्कृतिक योगदान फार मोठे आहे. त्याला कविवत्सल म्हणून ओळखले जाते. बृहत्कथा या प्रसिद्ध ग्रंथाचा लेखक गुणाढ्य याला या राजाने राजाश्रय दिला होता. हाल राजाने 'गाथासप्तशती किंवा गाथासत्तसई' हा महत्वाचा ग्रंथ लिहिला आहे.

Scanned with CamScanner

४) <u>गौतमीपुत्र सातकर्णी</u> :- हा सातवाहन घराण्यातील पराक्रमी व नीतिमान कुशल राजा होऊन गेला. त्याने शक, यवन, पल्हव यांचा पराभव करून सातवाहनांची सत्ता पुन्हा महाराष्ट्रात प्रस्थापित केली. शक क्षत्रप नहपानाला पराभव करून त्याने महाराष्ट्राबरोबर सौराष्ट्र व माळवा हे प्रदेशही सातवाहनांच्या वर्चस्वाखाली आणले. या पराक्रमी राजाने स्वतःला <u>त्रि-समुद्र-तोय-पीत वाहन</u> म्हणजेच ज्याचे अश्व तीनही समुद्रांचे पाणी पितो असा राजा ही पदवी धारण केली. गौतमीपुत्र सातकर्णी हा प्रजाहितदक्ष, गुणी जनांना चाहता व वैदिक धर्माला आश्रयदाता होता.

५) <u>वासिष्ठीपुत्र श्री पुळुमावी</u> :- गौतमीपुत्रानंतर लगेचच वासिष्ठीपुत्र हा सातवाहनांना सत्ताधिश आला. कार्ले, अमरावती, नाशिक, जुन्नर येथील आलेखामधून त्यांची वरील माहिती मिळते.

६) <u>यज्ञश्री सातकर्णी</u> :- पुळुमावीनंतर यज्ञश्री सातकर्णी हा त्याचा पराक्रमी पुत्र सातवाहनांच्या सत्तेवर आला त्याने शक राजाकडून पुन्हा कोकण व माळवा प्रदेश जिंकून घेतले महाराष्ट्र, मध्यप्रदेश, गुजरात, आंध्र या प्रदेशात त्याची नाणी सापडतात.

७) <u>इतर सातवाहन राजे</u> :- यज्ञश्री सातकर्णी नंतर शकसेन, चंद्रश्री, व विजय सातकर्णी हे राजे होऊन गेले ते फारसे प्रभावशाली नव्हते, याचाच फायदा घेऊन सातवाहनांच्या मांडलिक राजांनी बंडखोरी केली, शकांनीही या काळात सातवाहन राज्यावर आक्रमण केले. सेवटी इ.स. २३० मध्ये सातवाहन सत्ता संपुष्टात आली.

Scanned with CamScanner

## + शुंग- सातवाहनकालीन राज्यव्यवस्था व प्रशासन :-

मौर्यानंतर शुंग व सातवाहन या भारतीय सत्तांनी या देशाच्या इतिहास व संस्कृतिवर आपला मौलिक ठसा उमटविला. त्यांच्या राजकीय प्रशासकीय, सामाजिक, आर्थिक व सांस्कृतिक जीवनाची माहिती घेणेही महत्त्वाचे आहे.

(१) राज्यव्यवस्था :- मौर्य व मौर्योत्तर भारतातील राजपदीच्या राजकीय व प्रशासकीय व्यवस्थेचा प्रभाव शुंग-सातवाहनांच्या व्यवस्थेवर दिसून येतो. राजपद, मंत्रिमंडळ, इतर अधिकारी, न्यायदान इत्यादींच्या माध्यमातून आपण या काळातील राज्यव्यवस्थेचा अभ्यास करू शकतो.

(१) राजपद :- राज्यकारभारातील राजा हे सर्वोच्चपद होय. राजपद हे वंशपरंपरागत होते. पित्याकडून ज्येष्ठ पुत्राला वारसाहक्काने हे पद मिळत असे. सातवाहन राजे गौतमीपुत्र, वासिष्ठीपुत्र असे आपल्या नावापुढे आईचे नाव लावत असले तरी सांगितो पित्याकडूनच राजपदाचा वारसा मिळत होता. राजा हा प्रजाहितदक्ष व लोककल्याणकारी असावा असा संकेत होता. आपल्या राजसत्तेचा वारसा ठरविण्याचा अधिकार राजाला होता. अमरा, न्याय, सुव्यवस्था याचे सर्व अधिकार व अंतिम सत्ता राजाची होती.

(२) राजाचे अधिकार व कर्तव्य :- परकीय आक्रमकांपासून प्रजेचे रक्षण करणे, २) प्रमुख सेनापती म्हणून सैन्याचे नेतृत्व करणे - (३) न्यायाधीश म्हणून न्यायदान करणे, ४) शांतता व सुव्यवस्था राखणे ५) प्रजेच्या सर्वांगीण विकासासाठी प्रयत्नशील राहणे.

(३) मंत्रिमंडळ :- या काळातील राज्यव्यवस्थेचा दुसरा महत्त्वाचा घटक मंत्रिमंडळ होता. राजाने आपल्या राज्यकारभाराचे विविध खात्यात विभाजन केले होते. त्याप्रमाणे खात्याचा प्रमुख म्हणून मंत्री नेमला जात असे. मंत्रिमंडळ हे सल्लागार मंडळासारखे होते. मंत्र्यांचा सल्ला 'बंधनकारक नव्हता'; वादातीत सर्व सत्तेचा राजा हाच प्रमुख होता.

Scanned with CamScanner

(४) प्रशासन :- शुंग सातवाहनांनी आपल्या राज्याचा कारभार पाहण्यासाठी कार्यक्षम प्रशासन व्यवस्था निर्माण केली होती. साधारणत: त्यांचे साम्राज्य व मांडलिक राज्य असे राज्याचे दोन भाग केले जात होते. राज्यकारभाराच्या सोयीसाठी साम्राज्याचे विविध भागात विभाजन केले होते. आमात्य, व महामात्र ही अधिकाऱ्यांचीही नावे त्या काळातही पाहायला मिळतात. प्रत्येक विभागात एक शहर व इतर खेडी असत. त्या त्या खेड्यांचे असलेल्या विभागास विषय म्हणत. व त्याच्या प्रमुखास विषय पति म्हणत असत.

ग्रामीण भागातील प्रशासन गौल्मिकाच्या हाती सोपविले जात असे छोट्या लष्करी तुकडीला गौल्मिक हा प्रमुख असे. गावातील शांतता व सुव्यवस्था राखण्याची जबाबदारी गौल्मिकाची असे. तो गावचा प्रमुख म्हणूनही काम पाहत असे.

(२) शुंग सातवाहन कालीन समाजजीवन :- मौर्योत्तर काळात भारतात शुंग-सातवाहन या देशी राजवटी प्रमाणेच शक, कुषाण, पार्थियन, ग्रीक या परकीयांच्या राजवटी देखील कार्यरत होत्या. त्याचा भारतीय समाजव्यवस्थेवर प्रभाव पडला. त्याचा आढावा पुढील प्रमाणे

(अ) वर्णाश्रम व्यवस्था :- शुंग सातवाहन राजे वैदिक धर्माला राजाश्रय देणारे होते. त्यामुळे त्यांनी आपल्या काळात चातुर्वर्ण व्यवस्थेला चालना दिली. शुंग-सातवाहन या ब्राह्मणी सत्ता होत्या. त्यामुळे समाजात ब्राह्मणांचे वर्चस्व राहिले. त्यांनी शत्रूंनाही क्षत्रिय म्हणून आपल्यात सामावून घेतले. धर्मशास्त्रानुसार राज्यकारभार करणे हे क्षत्रियाचे कार्य होते. त्यामुळे पश्चात्य उपऱ्या कुळांचा हा महत्त्वाचा वर्ग होता. व्यापारी कारागिरांचा वैश्य वर्ग या काळात मोठ्या प्रमाणात होता.

३) जाति व्यवस्था :- वर्णपद्धतीतून जाति संस्था अस्तित्वात आली होती. त्यातल परकीयांना भारतीयांनी आपल्या समाजात सामावून घेतले होते. त्यामुळे जातीप्रथेत संकर होऊन अनेक प्रश्न निर्माण झाले. जाती-जातीतील बंधने दृढ बनल्याने त्याच्या मिळाली. जाति-जातीतील संबंधांना सामाजिक बंधनाचे स्वरूप आले. व्यवसायानुसार जाती रूढ लागल्यामुळे जातींची संख्या वाढली.

३) कुटुंबव्यवस्था :- समाजात एकत्र कुटुंब पद्धति अस्तित्वात होती कुटुंबात आईपेक्षा वडिलांना अधिक महत्त्व होते. म्हणजेच कुटुंब पितृसत्ताक पद्धतीची होती. सातवाहन राजे मातृवंशाधिष्ठीत पद्धतीला पुरस्कार करत होते. थोडक्यात कुटुंबाचे स्वरूप मोठे असून पुरुषांनाच कुटुंब प्रमुख म्हणून सर्वाधिकार होते.

४) विवाहसंस्था :- समाजात निरनिराळे विवाह प्रकार रूढ होते. एकपत्नीत्वास समाज मान्यता असली तरी बहुपत्नीत्वास विरोध नव्हता. बालविवाहाची प्रथा अस्तित्वात होती. पुरुषांचे पुनर्विवाह होत होते. धार्मिक सामाजिक विधी म्हणून विवाहाला समाजात महत्त्वाचे स्थान दिले जात होते.

५) स्त्रियांचे स्थान :- या कालखंडात स्त्रियांवरील बंधने वाढत गेली. स्त्री स्वातंत्र्याचा समाजावर विघातक परिणाम झाला अशी विचारप्रणाली मांडली जाऊ लागली. बालविवाह होऊ लागले त्यामुळे स्त्रीशिक्षण मागे पडू लागले. वेदाभ्यासाचा स्त्रियांना अधिकार काढून घेण्यात आला त्यामुळे स्त्रीला एक प्रापंचिक स्वरूप प्राप्त झाले. असे असले तरी संसारातील स्त्रीचे स्थान श्रेष्ठ मानले होते. सातवाहन राजांनी तर आपल्या नावापुढे आईचे नाव लावले होते.

मौर्यकाळात भारतीय समाजजीवनात अनेक परिवर्तने आली त्यामुळे समाजाचे विविध गटात विभाजन झाले.

Scanned with CamScanner

* शुंग - सातवाहन कालीन अर्थव्यवस्था :- मौर्योत्तर काळात राजकीय दृष्ट्या अनेक चढउतार आले तरी शेती, उद्योग व्यापार, चलन या आर्थिक बाबतीत देशाची बैठक पूर्वीप्रमाणेच मजबूत राहिली.

१) शेती :- शेती हा या काळातील लोकांना प्रमुख व्यवसाय होता. स्थिर शांततामय जीवन व प्रजाहितदक्ष शासनकर्ते यामुळे या काळात शेतीला चालना मिळाली. महसुलाच्या दृष्टीने शेतीला उत्तेजन देण्याच्या सर्वच राज्यकर्त्यांनी प्रयत्न केला. शासनाकडून शेतीच्या लागवडीला जास्तीत जास्त प्रोत्साहन दिले. पाटबंधारे, कालवे, तलाव या माध्यमातून शेतीला पाणी पुरवठ्याच्या सुविधा निर्माण करून दिल्या. गरजेनुसार करात सवलत देऊन विविध पिके घेण्यास शेतकऱ्यांना प्रोत्साहन देण्यात आले. शेतीबरोबर पशुपालनालाही चालना देण्यात आली.

२) उद्योग व्यवसाय :- या काळात सत्ताधिशांनी उद्योग व्यवसायालाही चालना दिली. सातवाहनांच्या नाशिक येथील आलेखात कुलारिक (कुंभार) औदयांत्रिक (ओरा-पाणी काढण्याचे यंत्र) तीलपीषक (तेली) कोलिक (कोष्टी) इत्यादींचे उल्लेख आहेत. यावरून समाजाच्या गरजा भागविणारे उद्योगधंदे ठिकठिकाणी प्रचलित होते.

३) व्यापार :- या काळात व्यापाऱ्यांच्या श्रेणी होत्या. विविध वस्तूंचा व्यापार करणारे व्यापारी प्रसिद्ध होते. धान्यिक (धान्याचे व्यापारी) गांधिक (सुगंधी द्रव्याचे व्यापारी) मालाकार (माळी) सुवर्णकार (सोनार) तसेच पाथरवट, कुंभार, कोष्टी इत्यादी उद्योजक व्यापारी त्या काळातील अर्थव्यवस्थेत महत्त्वाचे होते.

Scanned with CamScanner

४) परकीय व्यापार :- या काळात भारताला परदेशाशी व्यापारही मोठ्या प्रमाणात चालू होता. समुद्रमार्गाने इजिप्त, ग्रीस, रोम या देशांशी भारताचा व्यापार चालत असे. भारतातून, तिळाचे तेल, साखर, पशूंची कातडी, हिरे माणके मसाल्याचे पदार्थ रेशीम कापड, सुगंधी द्रव्य निर्यात केले जात असत. तर तांबे, कथील, शिसे, काच यांची आयात केली जात असे.

५) बंदरे व बाजारपेठा :- देश विदेशाशी या काळात पश्चिम किनाऱ्यावरील बंदरातून व्यापार चालत होता. भरूच (भडोच), सोपारा, कल्याण, कोट्टायम, कावेरीपट्टणम, मच्छलीपट्टणम इत्यादी या काळातील प्रसिद्ध बंदरे होती. तसेच तेर, नाशिक, जुन्नर, करहाटक (कराड) प्रतिष्ठान, पाटलिपुत्र, पैठण श्रावस्ती, साकेत, तक्षशिला, उज्जयनी या भारतातील प्रसिद्ध बाजारपेठा होत्या. शासनाने व्यापार उद्योगांना संरक्षण दिल्यामुळे देशाची आर्थिक भरभराट होण्यास मदत झाली.

६) चलनव्यवस्था :- या काळात शुंग सातवाहनांनी स्वतःची नाणी प्रचलित केली. सातवाहनांनी सोन्याची नाणी त्यांच्या समृद्धीची साक्ष पटवितात. त्यांनी सोने, चांदी, शिसे, तांबे यांची नाणी काढली. त्यावर विविध चित्र, चिन्ह व ब्राह्मी लिपीतील मजकूर उमटविला.

थोडक्यात शुंग व सातवाहन काळातील आर्थिक जीवन स्थिर व संपन्न होते.

---

## (४) शुंग - सातवाहन कालातील सांस्कृतिक जीवन :-

सांस्कृतिक विकासाला स्थैर्याची आवश्यकता असते. मौर्यानंतर कालखंडात राजकीय, सामाजिक, व आर्थिक दृष्ट्या बरीच स्थित्यंतरे आली. साहजिकच त्याचा शुंग-सातवाहनांच्या काळातील सांस्कृतिक विकासावर प्रभाव पडला. मूळ भारतीय कला कौशल्यावर, जीवनपद्धतीवर त्याचा परिणाम आल्याचे पहायला मिळते. त्याच्या थोडक्यात वृत्तांत पुढील प्रमाणे -

१) चैत्य :- शुंग सातवाहन काळात स्थापत्य क्षेत्रात भरीव स्वरूपाचे कार्य झाले आहे. चैत्य, विहार, स्तूप मंदिरे यांची मोठ्या प्रमाणात निर्मिती या काळात झाली. कार्ले येथील सभाच्या वैशिष्ट्यपूर्ण खांबा असलेले भव्य व सुंदर चैत्य या काळात निर्माण झाला. कार्ले येथील चैत्य स्थापत्य कलेचा उत्कृष्ट नमुना आहे. शुंगाच्या काळातील भाजे चैत्य स्थापत्य कलेचा उत्कृष्ट नमुना आहे.

२) विहार :- स्थापत्याच्या दृष्टीने या काळातील कार्ले भाजे, नाशिक येथील विहार ही उत्कृष्ट दर्शक आहेत. विहार ही बौद्ध भिक्षुसाठी बांधलेली निवासस्थाने आहेत. कलेच्या दृष्टीने त्याचे मूल्य विशेष महत्त्वाचे आहे.

३) स्तूप :- या काळातील स्तूप हे देखील स्थापत्याचे उत्कृष्ट नमुना आहेत. स्तूप हे गौतम बुद्धांची केवळ स्मारके नव्हती तर ती उत्कृष्ट कलेची अजोड प्रतिकेही आहेत. आंध्र प्रदेशात कृष्णा-गोदावरी खोऱ्यात अशी बांधकामे झाली. अमरावती येथील सुंदर स्तूपाचे याच काळात विस्तारीकरण झाले. शुंगाच्या काळात भारहूत स्तूपाची रचना व सांची स्तूपाची पुनर्रचना झाली.

④ मंदीर शिल्प व लेण्या :- स्थापत्याच्या व शिल्पकलेच्या दृष्टीने हा कालखंड विशेष भरभराटीचा होता. शुंग-सातवाहन हे वैदिक धर्माचे पुरस्कर्ते असून या काळात धनी व्यापाऱ्यांच्या साहाय्याने सुंदर शिल्पकलेची बहरली होती. जगविख्यात अजंठा लेण्यांमधील ८,९,१०,१२,१३ या क्रमांकाच्या लेण्यातील काही शिल्पकाम व चित्रकाम सातवाहनांच्या काळातच अविष्कृत झाले. त्यांना हा वैभवशाली सांस्कृतिक वारसा अप्रतिम स्वरूपाचा आहे.

५) भाषासाहित्य :- शुंगाच्या काळात संस्कृत भाषेस प्रोत्साहन मिळाले तर सातवाहनांच्या काळात प्राकृत भाषेचा वापर मोठ्या प्रमाणात झाला. संस्कृत भाषेतही या काळात विपुल लेखन झाले. हाल हा सातवाहन राजा विद्वान लेखक होता त्याने लिहिलेल्या 'गाथासप्तशती' हा महाराष्ट्रातील पहिला मोठा ग्रंथ मानला जातो. हालाचा दरबारातील गुणाढ्य याने पैशाची भाषेत 'बृहत्कथा' हा प्रसिद्ध ग्रंथ लिहिला.

६) लोकजीवन :- या काळात परकीयांच्या सहवासामुळे लोकांच्या कला वेशभूषा, व सौंदर्य प्रसाधने यात बदल झाला. पूर्वीपासूनच लोक सुती कापडाचा मोठ्या प्रमाणात वापर करत होते. पैंजण, कर्णभूषणे, कमरपट्टा, कंकण, अंगठ्या इत्यादि स्त्रियांचे अलंकार होते. तसेच द्यूत, संगीत, नृत्य, शिकार ही करमणुकीची साधने होती. शैव-वैष्णव पंथानाही लोकप्रियता लाभली होती. जैन व बौद्ध धर्माबाबतही सातवाहनांनी सहिष्णुतेचा अवलंब केला होता.

थोडक्यात मौर्योत्तर काळात भारताच्या सांस्कृतिक जडणघडणीमध्ये शुंग व सातवाहन या राजवंशाचे योगदान महत्वाचे आहे. मौर्योत्तर भारतातील अस्थिरतेचा फायदा घेऊन अनेक परकीय राजवटींनी भारतात आपला प्रभाव निर्माण केला होता. अशा काळात भारतीय संस्कृती, परंपरा पुनर्जीवित करण्याचे व जोपासण्याचे अतिशय मौलिक कार्य शुंग व सातवाहन राजवटींनी केले.

Scanned with CamScanner